निशाणी यु—३ पुढे चालू....                                   संदर्भ (औ.वि.का.) क्र. १२/२०१७

शपथेवर उलटतपास प्रथम पक्षकार यांचेतर्फे विधीज्ञ श्री. व्ही. डी. नार्वेकर यांचेमार्फत

३०. हे म्हणणे खरे आहे की नोकरनाम्यात मला वयाचे ५५ व्या वर्षी सेवानिवृत्त करणार असे नमूद केले होते, त्याप्रमाणे मला सेवानिवृत्त करण्यात आले. मला चुकीच्या पध्दतीने सेवानिवृत्त करण्यात आले अशी लेखी तक्रार मी वि. प. संघाकडे सेवानिवृत्तीनंतर केलेली नाही. तद्नंतर सेवानिवृत्तीनंतरचे सर्व फायदे मी स्विकारले. सदर विषयाबाबत मी कामगार संघटनेकडे लेखी तक्रार केली होती. लेखी तक्रार केलेनंतर कामगार संघटनेने आमच्या तक्रारीचे निराकरण केलेले नाही. हे खरे आहे की आमचे सारख्या इतर काही कामगारांनी वयाच्या ५५ व्या वर्षी चुकीच्या पध्दतीने सेवानिवृत्त करण्यात आले या आशयाच्या तक्रारी वि. प. यांचेविरूध्द न्यायालयात दाखल केल्या होत्या. सदर केसेसचा निकाल कामगारांच्या बाजूने लागला. सदर निकालाबाबत मला समजले. हे खरे नाही की त्यांना अनुतोष मिळाले म्हणून मी प्रस्तुत विवाद उपस्थित केलेला आहे.

३१. हे खरे आहे की सन २०१७ च्या सुरूवातीस मी हा विवाद उपस्थित केला. हे म्हणणे खरे आहे की इतर कामगारांनी दाखल केलेल्या केसेस ते जिंकले हे मला सन २०१५ च्या उत्तरार्धात कळाले. हे खरे नाही की दरम्यानच्या काळात मी त्यांचे केसेसमध्ये काय निकाल होतो याची वाट पाहत होतो. हे म्हणणे खरे नाही की मला औद्योगिक न्यायालयात झालेल्या निर्णयाबाबत कल्पना होती. हे खरे आहे की मला सेवानिवृत्त केलेपासून ते प्रस्तुत विवाद उपस्थित करेपर्यंत मी त्याबाबत कोणतीही दाद मागितलेली नाही किंवा तक्रार केलेली नाही.

३२. हे म्हणणे खरे आहे की मला सेवानिवृत्त केले त्यावेळी मी वि. प. यांचेकडे असिस्टंट मॅनेजर म्हणून कार्यरत होतो. हे खरे आहे की माझे हाताखाली दोन कर्मचारी काम करीत होते. हे खरे आहे की सदर कर्मचा—यांच्या कामावर देखरेख करण्याची जबाबदारी माझेवर होती. हे खरे नाही की त्यांनी काही चुका केल्या तर त्याचे रिपोर्ट मी मुख्य कार्यालयास पाठवित होतो. हे म्हणणे खरे नाही की मला रिपोर्ट करण्याचे अधिकार नव्हते हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की इतर कामगारांना फायदे मिळाले हे जाणून मी प्रस्तुत खोटा विवाद उपस्थित केला आहे.माझे उत्पन्नाचे साधन आहे त्यावर उपजिविका चालू आहे. हे म्हणणे खरे नाही की माझे सरतपासातील मजकुर हा खोटा व चुकीचा आहे. हे म्हणणे खरे नाही की मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण. फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती

**सही/—**

दिनांकः— ०५.०७.२०१९                                        (अमित अ. लऊळकर)
कोल्हापूर                                                         पिठासीन अधिकारी,
                                                        कामगार न्यायालय क्र.२, कोल्हापूर.